**MHWR060014452026**

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र.२) हिंगणघाट यांचे न्यायालय**

**एस. सी. सी. क्र. १०२८/२०२६**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | गुन्हा घडल्याची तारीख | : | ०१/०५/२०२६ |
| (२) | गुन्ह्याच्या फिर्यादची तारीख | : | ०१/०५/२०२६ |
| (३) | अभियोग पक्ष | : | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पो.नि. पो. स्टे. वडनेर |
| (४) | आरोपीचे नाव | : | **सुरज ज्ञानेश्वर घोडे,**<br>वय :-२७ वर्षे, व्यव:- ,<br>रा. :- दारोडा, ता. हिंगणघाट,<br>जि. वर्धा. |

(५) गुन्ह्याचा तपशील : दिनांक ०१/०५/२०२६ रोजी ०३.१५ वाजेच्या सुमारास तुम्ही मेवात हॉटेलच्या मागे तुमचे अस्तीत्व लपविण्याचे हेतुने अंग चोरून तोंडाला टॉवेल बांधून गुन्हा करण्याच्या उद्देशाने मिळून आले. म्हणुन तुमच्या विरुध्द महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम १२२ अन्वये गुन्हयाची तोहमत ठेवण्यात आली आहे.

**आरोपीचे निवेदन :-**

प्र.क्र.१ :- तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय ?
उत्तर :- होय.

प्र.क्र.२ :- आपणास आता जो आपणाविरुध्दचा दोषारोप वाचुन दाखविला तो समजला काय ?
उत्तर :- होय.

प्र.क्र.३ :- तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तर :- होय.

आरोपीची सही

AMOL B INGOLE
Digitally signed by AMOL B INGOLE
Date: 2026.08.03 17:28:03 +0530

**(अ.भा.इंगोले)**
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग,
२ रे कोर्ट, हिंगणघाट.

## <u>न्यायनिर्णय</u>

आरोपीला त्याचेवर ठेवलेले दोषारोप वाचुन व समजावुन सांगितले. आरोपीला ते समजले याची खात्री केली. ते स्वतःहुन गुन्हा कबुल करीत आहेत. म्हणुन मी त्यांचे निवेदनानुसार आरोपीस दोषी ठरवित आहे. आरोपीने त्याचे आधारकार्डचे मूळ व झेरॉक्स प्रत सादर केली. त्यावरून तो तोच असल्याची खात्री झाली.

आरोपीला शिक्षेच्या मुद्यावर ऐकण्यात आले. आरोपीने कोर्टास विनंती केली की त्यांच्यावर दया दाखववी. महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम १२२ वाचले. सदर कलमानुसार आरोपीस सहा महिन्यापर्यंतचा सश्रम कारावासाची शिक्षा व पाचशे रूपये दंडाची शिक्षेचे स्वरूप आहे. परंतु विशेष कारण देऊन सदर शिक्षा ही एक महिन्यापेक्षा कमी देता येते. आरोपीने सदर गुन्हा स्वतः कबूल केला व त्याने असा गुन्हा परत करणार नाही असे सुध्दा पूरशीस द्वारे न्यायालयास कळविले. त्यामूळे गुन्ह्याचे स्वरूप बघता आरोपीस कमी शिक्षा करणे योग्य वाटते. गुन्हयाचे स्वरुप लक्षात घेता व आरोपीने केलेली विनंती लक्षात घेता व आरोपीविरुध्द इतर कोणत्याही गुन्हयात अगोदर शिक्षा झालेली असल्याचे निर्देशनास आले नाही. ही बाब लक्षात घेता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१. **आरोपी सुरज ज्ञानेश्वर घोडे,** यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५ प्रमाणे दोषी ठरविण्यात आले आहे व आरोपीला महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम १२२ ह्या गुन्ह्यासाठी न्यायालय उठेपर्यंत शिक्षा व दंड रक्कम रुपये ५००/- (फक्त पाचशे रुपये) व दंड न भरल्यास सात (७) दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा आरोपीने भोगावयाची आहे.

AMOL B INGOLE
Digitally signed by AMOL B INGOLE
Date: 2026.08.03 17:28:15 +0530

दि.०३/०८/२०२६

**(अ.भा.इंगोले)**
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग,
२ रे कोर्ट, हिंगणघाट.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Shri. B.S. Wani |
| Court | : 2nd Jt. CJJD & JMFC, Hinganghat. |
| Judgment Date | : 03/08/2026. |
| Judgment signed by the Presiding Officer on | : 03/08/2026. |
| Judgment uploaded on | : 03/08/2026. |